जा.क्र.का.15/महाविद्यालय इमारत/मूल्यांकन/
परिपत्रक/ 990
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि. 28 /9/2015.

**विषय :- महाविद्यालय इमारतीचे मूल्यांकनाबाबत.**

**परिपत्रक :-**

वार्षिक बाजार मूल्य दर तक्त्यामधील अंमलबजावणी सूचना क्र.7 (ड) मध्ये 'शाळा व धार्मिक इमारतीचे' मूल्यांकन, वार्षिक मूल्य दर तक्त्यामधील, संबंधित मूल्य विभागातील, सदनिका दराने करणेबाबत सूचना आहेत. मात्र अभियांत्रिकी / वैद्यकीय / मॅनेजमेंट कॉलेज यांचा त्यामध्ये उल्लेख नाही. अंमलबजावणी सूचना क्र.7 (ड) हा ज्या शाळा व्यावसायिक स्तरावर चालवल्या जात नाहीत व ज्यांना प्रयोगशाळा, वर्कशॉप इ.सुविधा आवश्यक नसतात, अशा प्राथमिक व माध्यमिक शाळा इमारतीना, सदनिकेचा दर लागू करणे अपेक्षित आहे. अभियांत्रिकी / वैद्यकीय / व्यवस्थापन क्षेत्रातील महाविद्यालये ही पूर्णपणे व्यावसायिक स्तरावर चालविली जातात. त्यांना प्राथमिक / माध्यमिक शाळांच्या तुलनेत मोठया इमारती, प्रयोगशाळा, वर्कशॉप इ.सुविधा आवश्यक असतात. या बाबी विचारात घेऊन शैक्षणिक इमारतींच्या व मिळकतीच्या मूल्यांकनासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

बालवाडी, प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा व धार्मिक इमारतींचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यामधील संबंधित मूल्य विभागातील निवासी सदनिका दराने येणारे मूल्य व सूचना क्र.8 (i) (ब) नुसार येणारे मूल्य यापैकी जास्तीचे मूल्यावर मुद्रांक शुल्क आकारणी करावी.

सर्व महाविद्यालयांच्या (अभियांत्रिकी / वैद्यकीय / व्यवस्थापन इ.) इमारतींचे मूल्यांकन संबंधित मूल्य विभागातील वरील मजल्यावरील व्यावसायिक / कार्यालयासाठीच्या दराने येणारे मूल्य व सूचना क्र.8 (ii) (ब) नुसार येणारे मूल्य यापैकी जास्तीचे मूल्यावर मुद्रांक शुल्क आकारणी करावी.

सदर परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharshtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
( डॉ.रामास्वामी एन. )
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.महालेखाकार (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश मूल्यांकन मुंबई.
5) सहायक संचालक नगर रचना, मूल्यांकन,कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक) पुणे.

-/ सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.

8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक मुंबई/कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

-/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

9) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

10) श्रीमती.निलीमा देसाई, NIC पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता